(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/पदो-बिसं पोउपनि (वाह.) ते पोनि (वाह.) /४६/२०२४ मुंबई, दिनांक १५ /०५/२०२५

**वाचा :-** १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९,

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१, व

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १४/०७/२०२१

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात येत असून, दि.२५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. ०१ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रता तपासून निवडसूची तयार केली आहे. निवडसूचीमध्ये पात्र ८ अधिका-यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. १४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आलेला आहे.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद ८ पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून " **पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) (सुधारीत पदनाम पोलीस निरीक्षक, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग)** " या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.५ मधील घटकात करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ. क्र. | पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | अरुण किसन नर्के | मुंबई शहर | पुणे | सातारा |
| २. | अशोक नारायण तुरेवाले | सोलापूर ग्रामीण | छत्रपती संभाजी नगर | बि.सं. नांदेड परिक्षेत्र |
| ३. | राजू दयाराम अतकरी | मुंबई शहर | नागपूर | बि.सं. नागपूर परिक्षेत्र |
| ४. | रविंद्र उत्तरेश्वर अभंगराव | रा.रा.पो.बल, गट क्र.८, मुंबई (पुणे ग्रामीण येथे बदली आदेशित) | पुणे | पुणे ग्रामीण |

| अ. क्र. | पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ५. | सुनिल मा. पोंदे | धाराशिव | नागपूर | नागपूर शहर |
| ६. | राजेश कमलाकर तरमळे | बुलढाणा | अमरावती | अमरावती ग्रामीण |
| ७. | संजय मुरलीधर मराठे | मुंबई शहर | नाशिक | अहिल्यानगर (अहमदनगर) |
| ८. | कैलास राजधर पाटील | धुळे | नाशिक | नाशिक ग्रामीण |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा

व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दि. ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६. सदर पदोन्नती आदेशामधील पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) हे जर आदेशामध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे या कार्यालयास न चुकता कळवावे.

**७. पदोन्नती झालेल्या वरील सर्व पोलीस अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला ,**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, मुंबई शहर / नागपूर शहर
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, पुणे परीक्षेत्र, पुणे /छ.संभाजी नगर परिक्षेत्र / कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर/ अमरावती परीक्षेत्र, अमरावती / नाशिक परीक्षेत्र, नाशिक/ नागपूर परिक्षेत्र, नागपूर / नांदेड परिक्षेत्र, नांदेड
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे
पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण / धाराशिव / बुलढाणा / धुळे / पुणे ग्रामीण / सातारा / अमरावती ग्रामीण / अहिल्यानगर / नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे / बिनतारी संदेश, पूर्व विभाग, नागपूर / बिनतारी संदेश, मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर
समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र. ८, मुंबई

प्रत सस्नेह सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई

महालेखापाल -१, मुंबई / महालेखापाल -२, नागपूर

अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे, मुंबई

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश (वाहतूक) ( PSI W/L (Traff.) to PI W/L (Traff.) Promotion) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. ०२/ ०९/ ११/ ११-अ/ ३६/ ४०

15/07/2016

( डॉ. सुखविंदर सिंह )

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.